पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५२। किंमत - २ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार। २४/०६/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# स्मार्ट मीटर ऐच्छिक, महावितरणची न्यायालयात कबुली

## मग ग्राहकांवर दबाव का? नागरिकांचा सवाल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गेल्या काही महिन्यांपासून राज्यभरात स्मार्ट मीटर बसवण्याच्या मोहिमेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर महावितरणने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. महावितरणने न्यायालयाला सांगितले की, स्मार्ट मीटर विशेषतः प्रीपेड स्मार्ट मीटर हे ग्राहकांसाठी बंधनकारक नसून पूर्णपणे ऐच्छिक आहेत.




ही माहिती समोर आल्यानंतर राज्यातील अनेक ग्राहक आणि विविध संघटनांनी समाधान व्यक्त केले असले, तरी दुसरीकडे महावितरणच्या प्रत्यक्ष कारभाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण राज्यातील विविध भागांत ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. स्मार्ट मीटरविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी न्यायालया समोर गंभीर मुद्दे मांडले. महावितरणकडून विद्यमान मीटर बदलण्यासाठी ग्राहकांवर दबाव टाकला जात असून, अनेकांना ४८ तासांत स्मार्ट मीटर बसवण्यात येणार अशा आशयाचे संदेश पाठवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे नागरिकांमध्ये भीती, संभ्रम आणि असंतोष निर्माण झाल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

राज्यातील अनेक ग्राहक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पक्षांनी स्मार्ट मीटर योजनेला सुरुवातीपासून विरोध दर्शविला आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज बिलांमध्ये वाढ होण्याची शक्यता, प्रीपेड पद्धतीमुळे सर्वसामान्य ग्राहकांवर आर्थिक ताण येण्याची भीती तसेच खासगी कंपन्यांना होणारा फायदा यासंदर्भात विविध शंका उपस्थित केल्या जात आहेत.

अनेक ठिकाणी नागरिकांनी आंदोलन, निवेदने आणि लोकप्रतिनिधींमार्फत शासनाकडे तक्रारीही केल्या आहेत. काही भागांमध्ये महावितरणच्या पथकांना ग्रामस्थांच्या विरोधालाही सामोरे जावे लागल्याच्या घटना घडल्या आहेत. महावितरणने न्यायालयात स्मार्ट मीटर ऐच्छिक असल्याचे स्पष्ट केल्यानंतर आता नागरिकांकडून एकच प्रश्न विचारला जात आहे - जर स्मार्ट मीटर बसवणे बंधनकारक नाही, तर ग्राहकांवर दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी का येत आहेत? ग्राहक संघटनांच्या मते, न्यायालयात एक भूमिका आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत दुसरी भूमिका दिसून येत असल्याने सरकार व महावितरणने याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे. तसेच कोणत्याही ग्राहकाच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसवले जाणार नाहीत, याची हमी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

स्मार्ट मीटर प्रकल्प हा केंद्र सरकारच्या ऊर्जा क्षेत्रातील आधुनिकीकरणाचा भाग मानला जात असला तरी त्याची अंमलबजावणी लोकसहभाग आणि पारदर्शकतेच्या आधारे होणे आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. न्यायालयातील महावितरणच्या भूमिकेमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी प्रत्यक्षात ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बदलण्याच्या तक्रारी थांबतील का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# उमेदवारी नाकारली, केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी मंत्रिमंडळातून राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती भवनाने मंगळवारी कुरियन यांच्या राजीनाम्याची माहिती दिली. प्रेस रिलीझमध्ये असे सांगण्यात आले की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे.



मात्र, राजीनाम्याचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही. ६५ वर्षीय कुरियन हे केरळमधील भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक आहेत. २१ जून रोजी त्यांचा ६ वर्षांचा राज्यसभा कार्यकाळ संपला होता. १८ जून रोजी झालेल्या निवडणुकीत भाजपने त्यांना पुन्हा उमेदवारी दिली नव्हती. जॉर्ज कुरियन ऑगस्ट २०२४ ते जून २०२६ पर्यंत मध्य प्रदेशमधून राज्यसभा खासदार होते. असे मानले जात आहे की, अलीकडील केरळ विधानसभा निवडणुकीत पक्षाने अपेक्षेप्रमाणे कामगिरी न केल्यामुळे त्यांना पुन्हा संधी मिळाली नाही.

टीव्ही डिबेट्समध्ये भाजपचा प्रमुख चेहरा असलेले कुरियन, केरळ दौऱ्यांदरम्यान पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या भाषणांचे मल्याळममध्ये भाषांतरही करत होते. ते केरळमधील प्रमुख ख्रिश्चन संप्रदाय सिरो-मालाबार कॅथोलिक चर्चमधून येतात. केरळमधील ख्रिश्चन समुदायामध्ये भाजपची पकड मजबूत करण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून त्यांची नियुक्ती मंत्रिमंडळात केली गेली होती. तथापि, केरळमध्ये २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत १४० सदस्यीय विधानसभेत भाजपने केवळ ३ जागा जिंकल्या.

जॉर्ज कुरियन यांच्या राजीनाम्यापूर्वी भाजपला दक्षिण भारतात आणखी एक मोठा धक्का बसला होता. तामिळनाडू भाजपचे माजी अध्यक्ष आणि पक्षाच्या प्रमुख चेहऱ्यांपैकी एक असलेले के. अन्नामलाई यांनी २ जून रोजी पक्षाचा राजीनामा दिला. ५ जून रोजी त्यांचा राजीनामा मंजूर झाल्यावर, अन्नामलाई यांनी त्यांच्या नवीन 'राजकीय चळवळी'ची घोषणा केली.

# अण्णा पुन्हा उपोषणाच्या पावित्र्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -माहिती अधिकार कायद्यात राज्याने गत १२ जून रोजी केलेल्या दुरुस्त्या लोकशाही विरोधी असल्याने त्या रद्द करण्याच्या मागणीसाठी ५ जुलैपासून राळेगणसिद्धी येथील यादव बाबा मंदिरात उपोषण करण्याचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात अण्णा हजारे यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारच्या या आदेशाचा देशातील माहिती अधिकार चळवळीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.



कारण या आदेशातील नव्या नियमांमुळे माहिती मिळविणे अधिक कठीण, खर्चिक आणि निर्बंधित होणार आहे. माहिती अधिकाराच्या उद्देशालाच यामुळे हरताळ फासला जाईल. हे लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात आहे. माहितीचा अधिकार हा शासनाने केलेला जनतेवर केलेला उपकार नसून नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे.अधिकारी मालक झाले आहेत का?जनता मालक आहे, तर अधिकारी सेवक. अधिकाऱ्यांनी सेवक म्हणून काम करावे. परंतु, माहिती लपवून अधिकारी मालक झाले आहेत. त्यामुळे आंदोलन करण्याचे ठरवले आहे, असे अण्णा हजारे यांनी स्पष्ट केले. तसेच लोकशाही व्यवस्थेत नियम तयार करताना व्यापक सार्वजनिक चर्चा, सूचना व हरकती मागवणे अपेक्षित असते. परंतु या दुरुस्त्यांबाबत कोणतीही व्यापक चर्चा झाल्याचे दिसत नाही, असा दावा करत, सरकारने प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक विभाग ऑनलाइन करायला हवा होता. माहितीचा अधिकार कलम ४ मधील १७मुद्दे आज कोणत्याही कार्यालयामध्ये पाहायला मिळत नाहीत. (पान ४ वर)

# संगमनेरमध्ये नव्या वाईन शॉपला नागरिकांचा नकार

## महिलांचा आक्रमक पवित्रा, आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

संगमनेर शहरातील नाशिक-पुणे महामार्गावरील टॉप टेन इम्पेरियल (यशोधनसमोर) येथे प्रस्तावित वाईन शॉपच्या स्थलांतरास स्थानिक नागरिक, महिला आणि व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन सादर केले. परिसरातील सामाजिक वातावरण, महिलांची सुरक्षितता आणि व्यापारी हितसंबंध धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त करत प्रशासनाने या स्थलांतरास परवानगी देऊ नये, अशी ठाम मागणी करण्यात आली.

टॉप टेन इम्पेरियलमधील व्यापारी व व्यावसायिकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य दारूबंदी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष अमर कतारी यांची भेट घेऊन वाईन शॉपला विरोध दर्शविला. त्यानंतर अमर कतारी यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांच्या शिष्टमंडळाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संगमनेर कार्यालयात जाऊन निवेदन दिले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित जागा व्यापारी संकुलामध्ये असून येथे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कुटुंबीयांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा ठिकाणी वाईन शॉप सुरू झाल्यास परिसरातील सुरक्षितता, सामाजिक वातावरण आणि व्यावसायिक व्यवहारांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. तसेच वाहतूक कोंडी, पार्किंगच्या समस्या आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



परिसरात महिलांसाठी अनेक व्यावसायिक आस्थापने असल्याने छेडछाडीच्या घटना वाढण्याची भीती व्यक्त करत महिलांनी राज्य उत्पादन शुल्क निरीक्षकांसमोर आपली व्यथा मांडली. दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. सरकारने नवीन दारू दुकाने सुरू करण्याऐवजी विद्यमान दुकाने बंद करण्याचा विचार करावा, अशी भावना महिलांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार अमोल खताळ आणि नगराध्यक्षा मैथिली तांबे यांनी या प्रकरणात लक्ष घालून कोणत्याही परिस्थितीत संगमनेरमध्ये नवीन दारू दुकान सुरू होऊ नये यासाठी प्रयत्न करावेत, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

प्रशासनाने नागरिकांच्या भावना आणि स्थानिक परिस्थितीचा विचार करून वाईन शॉपच्या स्थलांतरास परवानगी नाकारावी, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, (पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# अहिल्यानगर जिल्ह्यात २६ जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'येलो अलर्ट'

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात २२ ते २६ जून २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# काकडवाडी हद्दीतील पालखी मार्ग डांबरी रस्त्याचे काम पूर्णत्वास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील महत्वपूर्ण गावांना जोडणारा तसेच काकडवाडी हद्दीतील पालखी रस्त्यासंदर्भात प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून काकडवाडी हद्दीतील पालखी मार्ग रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सदर पालखी मार्ग रस्त्याचे काम पूर्णतःवास गेल्याने काकडवाडी ग्रामस्थांनी देखील समाधान व्यक्त केले आहे. पालखी मार्ग रस्त्याच्या कामास प्राधान्य देत पूर्ण केले आहे.

सदर पालखी मार्गे दरवर्षी आषाढी वारीचे निमित्ताने श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर दिंडी सोहळ्यामध्ये लाखो भाविक मार्गक्रमण करत असतात. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या भक्तीभावाने यामार्गे पंढरपूरकडे दरवर्षी प्रस्थान करत असतो. पत्रकार दत्तात्रय घोलप व ग्रामस्थांच्या पुढाकरतून हा रस्ता पूर्णत्वाकडे गेला आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे. सदर रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी लावून धरत, आवाज उठवून तसेच संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करत पूर्ण केला आहे.

# मंत्र्यांची अनुपस्थिती विधीमंडळात गोंधळ

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवन परिसरात राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहे. महागाई, दुष्काळ, पाणीटंचाई, वीजपुरवठा, ड्रग्सविरोधी कारवाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत सरकार प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम असल्याचा दावा केला आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांवरील आंदोलन, सभागृहातील गदारोळ, नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप आणि महत्त्वाच्या घोषणांमुळे अधिवेशनाचा दुसरा दिवस चांगलाच गाजला.

# रोटरी क्लब सेंट्रल,अकोलेच्यावतीने शुभम वाकचौरे यांचा सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- परखतपूर गावचे सुपुत्र तथा नगररचना विभागातील अधिकारी शुभम विष्णू वाकचौरे यांची सहाय्यक संचालक, नगररचना, अमरावती येथे नगर रचनाकार पदावर पदोन्नती झाल्याबद्दल रोटरी क्लब सेंट्रल, अकोलेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभात रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल देशमुख यांच्या हस्ते श्री. वाकचौरे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मा. नगरसेवक सचिन शेटे, निलेशशेठ देशमुख, सचिन देशमुख, डॉ. राहुल वाळे, सचिन आवारी, डॉ. तुषार गावडे, संदीप मोरे, डॉ. अद्वैत देशपांडे, विजय पावसे, सचिन आहेर, दिनेश नाईकवाडी, डॉ. प्रतिक घोडके, डॉ. रविंद्र डावरे, ह.भ.प. छगन महाराज खडके, मा. नगरसेवक प्रमोद मंडलिक, वैभव वैद्य, डॉ. गणेश नवले (श्री वेल्थ), भानुदास वाकचौरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी श्री. शुभम वाकचौरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नगररचना क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पदोन्नती मिळाल्याने अकोले तालुक्यासह परखतपूर गावाच्या नावलौकिकात भर पडल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच अकोले हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रकाश वाकचौरे, सौ. रूपाली वाकचौरे तसेच हॉस्पिटलमधील सर्व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री. वाकचौरे यांचा सत्कार केला. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करताना त्यांच्या यशाचा अभिमान संपूर्ण तालुक्याला असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

श्री. शुभम वाकचौरे यांच्या या उल्लेखनीय यशामुळे परखतपूर गावासह अकोले तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# खा. वाकचौरे धोका देतील ... मी तेव्हाच सांगितलं होतं - रूपवते

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पुन्हा एकदा पक्षांतर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरील आपल्या भावनिक आणि परखड पोस्टमधून त्यांनी वाकचौरे यांच्यासह त्यांना पाठिंबा देणाऱ्या राजकीय नेत्यांवर आणि पुरोगामी विचारवंतांवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे.

२००८ पासून आजपर्यंत हे सातव्यांदा पक्षांतर करत आहेत. गेल्या अनेक वर्षांतील सर्व राजकीय घडामोडी आज पुन्हा डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या आहेत, असे म्हणत रुपवते यांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघाची झालेली राजकीय हेळसांड दुर्दैवी असल्याची भावना व्यक्त केली.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काळातील घटनांची आठवण करून देताना त्यांनी म्हटले की, अनेक नेते, कार्यकर्ते, हितचिंतक, लेखक, विचारवंत तसेच डावे आणि समाजवादी गटातील व्यक्तींनी त्यांना निवडणूक लढवू नये, अन्यथा मतविभागणी होऊन भाजपला फायदा होईल, असा सल्ला दिला होता. मात्र, उमेदवार चुकीचा आहे आणि तो विचाराने कधीच तुमचा होणार नाही, असा आपला ठाम विश्वास होता. मात्र आपले ऐकले गेले नसल्याचे त्यांनी नमूद केले.

रुपवते यांनी पुढे म्हटले की, पक्षासाठी आणि विचारांसाठी सातत्याने काम करणाऱ्या युवक-युवतींना व महिलांना योग्य वेळी संधी मिळाली पाहिजे. मात्र, संधी देण्याऐवजी वारंवार पक्षांतर करणाऱ्यांनाच पुढे करण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक असल्याचे त्यांनी सूचित केले.



आज तुम्ही निवडून दिलेले खासदार थेट भाजपप्रणीत सत्तेत सामील झाले आहेत. मात्र मी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी राजकारण आणि समाजकारण करत असून माझ्या मूलभूत तत्त्वांपासून कधीही दूर गेले नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वंचित बहुजन आघाडीविरोधात निवडणुकीच्या काळात करण्यात आलेल्या टीका, गैरसमज, व्हायरल व्हिडिओ आणि भाषणांची आठवण करून देत रुपवते यांनी, वंचितबद्दल आणि माझ्याबद्दल गरळ ओकणारे, आज का शांत आहेत? कुणीच बोलत नाही का? असा थेट सवाल उपस्थित केला.

भाऊसाहेब वाकचौरे यांच्या नव्या पक्षप्रवेशानंतर शिर्डी लोकसभा मतदारसंघात राजकीय चर्चांना उधाण आले असून उत्कर्षा रुपवते यांच्या या प्रतिक्रियेमुळे महाविकास आघाडीतील राजकीय भूमिकांवरही नव्याने प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यांच्या वक्तव्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

खा. वाकचौरे यांनी स्वार्थापोटी सत्तेला जवळ केले आहे. पक्षांतराचा इतिहास असणाऱ्या आणि विकासाच्या गप्पा मारणाऱ्या खासदारांनी श्रद्धा आणि सबुरीचे धाम, किती झाले शिर्डीत काम? हे अगोदर सांगावे. खासदार साहेब, २ वर्षांच्या विकासकामांचे रिपोर्ट कार्ड जनतेला देणार का? प्रत्येक तालुक्यात भव्य सुसज्ज अभ्यासिकेचे काम कुठपर्यंत आले...ज्या मतदार राजानी निवडून दिले त्याला किमान उत्तर द्याल अशी अपेक्षा देखील उत्कर्षा रुपवते यांनी व्यक्त केली आहे.

# पळालेल्या खासदारांवर कारवाईसाठी ठाकरे सेना आक्रमक

मुंबई (वृत्तसंस्था)

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघालेले आहे. ऑपरेशन टायगरची सुरू असलेली चर्चा आज थांबली आहे, कारण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ६ खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. हा उद्धव ठाकरेंना मोठा धक्का मानला जात आहे. यानंतर आता ठाकरे गटाकडून खासदारांच्या अपात्रतेच्या कारवाईला सुरुवात झाल्याची माहिती समोर आली आहे. लोकसभा अध्यक्षांना याबाबत पत्र पाठवले जाणार आहे

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे खासदार नाराज असल्याची चर्चा सुरू होती. याबाबत माहिती मिळताच उद्धव ठाकरेंनी खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला काही खासदार प्रत्यक्ष तर काही खासदार ऑनलाईन पद्धतीने हजर होते. मात्र त्यानंतर ६ खासदार फुटल्याची माहिती समोर आली होती. यानंतर शिवसेना ठाकरे गटाने व्हीप जारी करत बैठक बोलावली होती, मात्र या बैठकीला या ६ खासदारांनी दांडी मारली होती. त्यामुळे या खासदारांना कारणे दाखवा नाटीस जारी करण्यात आली होती. मात्र एकाही खासदाराने या नोटीशीला उत्तर दिलेले नाही.



त्यामुळे आता या खासदारांवर अपात्रतेची कारवाई करण्याबाबत पावले उचलली जाणार आहे. आता बंडखोर खासदारांवर अपात्रतेची कारवाई केली जाणार आहे, याबाबत लोकसभा अध्यक्षांना पत्र पाठवले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीतील बैठकीला गैरहजर राहिल्याने या खासदारांवर कारवाई करण्याची मागणी या पत्राद्वारे केली जाणार आहे. त्यामुळे आता या खासदारांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# भाजपतर्फे नवनिर्वाचित आमदारांचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर -

अहील्यानगर जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार समारंभ शुक्रवार दि.२६जून रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने दुपारी ३.०० वाजता जिल्हा सहकारी बँकेच्या सहकार सभागृहात आयोजित करण्यात आला असल्याची माहीती भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग आणि शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते यांनी दिली. नुकत्याच संपन्न झालेल्या राहुरी विधानसभा आणि विधानपरीषदेची निवडणुक संपन्न झाली.राहुरी विधनासभा पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे उमेदवार आ.अक्षय कर्डीले मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. विधान परीषदेच्या निवडणुकीत अहील्यानगरचे भूमीपुत्र आणि गेली अनेक वर्षे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणारे सुनिल कर्जतकर यांची विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवड झाली. आ.विवेक कोल्हे आ.प्राजक्त तनपुरे यांचीही विधनापरिषद निवडणुकीत बिनविरोध झालेली निवड ही भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक आणि जिल्हयाच्या विकासात्मक वाटचालीला आणि पाठबळ देणारे आहे. जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधान परीषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या उपस्थितीत नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

# शिवनेरीचा ढाण्या वाघ : बेनके साहेबांना भावपूर्ण आदरांजली

## कार्य, कर्तृत्व आणि जनसेवेच्या आठवणींना उजाळा

कर्मयोगी सहकार महर्षी स्व. शंकरराव कोल्हे साहआज आपला जन्मदिवस. शिवनेरीचा ढाण्यावाघ. शरदचंद्रजी पवार साहेबांचां लाडका पटशिष्य.

आपण अनेक वर्षे शिवनेरीच्या आम जनतेवर साम्राज्य केल. आपण केलेली विकास काम व जुन्नर तालुक्याचा कायापालट हा शब्दात न सांगता येणारा. आपले विशेष कौतुक आपण शिवनेरीचा विकास कामासाठी जास्तीत जास्त आणलेला विकासनिधी व शिवनेरीचा बदललेला निसर्गरम्य चेहरा मोहरा. ओझर देवस्थानचा कायापालट होण्यापाठी मागे आपला सिंहांचा वाटा. तर शिवनेरी किल्याचा विकास, जुन्नर नगरीची वेस,किल्याला तटबंदी अशी किती किती विकास कामे सांगायची? आपल्या अंगी असलेला स्पष्टवक्तेपणा मनाला भोवतो.

प्रशासनावर एवढा दबदबा की आपल्या नुसत्या नावानी सुद्धा गोरगरीबांची कामे पटपट होत.माझ्या तालुक्यातील विद्यार्थी जगाच्या बाजारातील चढाओढीत कुठेही मागे पडता कामा नये म्हणून तालुक्यात आपण इंग्लिश मेडीयम काढलत. माझा आदिवाशी समाज शिक्षणा पासून वंचीत राहू नये म्हणून आपण काढलेल्या शाळा व वसतिगृह आपणा कडे असलेल्या दुरद्रुष्टीला त्रिवार सलाम...!

समाजकारण करत असताना संसाराच रोपट ही



छान जोपल. आपली पत्नी राजश्रीताई खंबीरपणे सावीत्रीबाई सारख्या सतत आपल्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहील्या. सर्व गुणसंपन्न पत्नी असल्याशिवाय आपण शुन्यातून एवढ मोठ साम्राज्य उभा करूच शकला नसता..! धन्यवाद ताई..!

एक मुलगा डॉ अमोल. जनतेच्या सेवेसाठी सोडून दिलात. दुसरा मुलगा अमित ज्ञानदा शिक्षण संस्थेसारख्या अनेक संस्था चालवत वडगांव कांदळी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष तसेत जुन्नर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष, आपली अपूर्ण स्वप्न पूर्ण करताना दिसत आहेत. समाजसेवेत स्वतःला झोकून देऊन तालुक्यात स्वतःच एक वेगळ वलय निर्माण केलय...!!

मा. आमदार अतुलशेठ... ! आपल्या बद्दल काय बोलाव.वडिलांची सर्व धुरा आपण खांद्यावर घेऊन आपल लोकसेवेचे काम चालू आहे.वडीलांचे सर्व गुण आपल्यात दिसतात. आपणाला सल्ला देण्याचा मला अधिकार नाही परंतु एक नागरीक म्हणून सांगाव वाटत व्हा वडीलां सारख आक्रमक..द्या स्वतःला समाजसेवेत झोकून..याचा अर्थ आपण कुठ कमी पडतात अस नाही.आपल भविष्य खूप उज्वल आहे.आपल्या हातून अनेक विकास कामांची गंगा वहाताना दिसत आहे. जुन्नर शहराला भरघोस निधी आपण दिला.दार्या घाट सर्वच म्हणतात होवू शकत नाही.या जगात अशक्य काय आहे माणूस चंद्रावर तर गेला. तालुक्याच्या पश्चिम पट्टयाचा गहन प्रश्न आहे. दाऱ्या घाट झाला तर अर्ध्या तालुक्याच नंदनवन झाल्या शिवाय राहणार नाही. शिवनेरी - लेण्याद्री रोप वे ? पत्नी गौरीताई उत्तम साथीदार. अनेक सामाजीक कार्यात दिसून येतात. त्यांची जिद्द व आत्मविश्वास वाखणण्या सारखा आहे..!!!

बेनके साहेब वाघासारखे जगलात. आता उरल्या त्या आठवणी

आता सहवास जरी नसला तरी
स्मुती सुंगध देत राहतील
जिवनाच्या प्रत्येक वळणावर साहेब
तुमची आठवण येत राहिल.

आज श्री.वल्लभ ना.सह.पतसंस्था जुन्नर मार्कट यार्ड या शाखेचा नुतनीकरण समारंभ आपल्या जन्मदिवसाचे औचित्य साधुन नियोजीत केला.त्यानीमीत्ताने एक आठवण जुन्नर शहरात पतसंस्था काढायची कै.कॅप्टन भाईसाहेब पुरंवंत! आणी कै. सिबी गांधीसाहेब यानी पतसस्था काढायचे ठरवले पतसंस्थेची परवानगी मिळाली पन त्या पतसंस्थेत सिबी गांधीचे नाव च नव्हते त्यामुळे कै.सिबी गांधी यांनी त्याच्या खुनशी वर सहकार मंत्राच्या कार्यक्रमात कै.श्री.मा.नामदार यांच्याकडुन कार्यक्रमाच्या स्टेजवर श्री.वल्लभ ना.पतसस्थेची परवानगी आणली आणी सराईपेठ येथे पतसंस्था स्थापन केली आज त्याच पतसस्थेच्या मार्कटयार्ड शाखेचा नुतनीकरण कार्यक्रम पार पडत आहे.शेवट पर्यत कै.सिबीगांधी त्याच्या बरोबर होते. अशा आनेक आठवणी आपणांस या निमीत्ताने सांगता येतील.जुन्नर तालुक्यात शभर टक्के निकाल इ.१० वी.चा ज्या शाळेचा लागेल त्या शाळेला कॉम्प्युटर लॅब देणार अशी सुरुवात करत,ज्या संस्थेत बेंच नाही त्याना मोफत बेंच देणे असे आनेक शालेय उपयोगी उपक्रम राबवत शैक्षणीक दर्जा सुधरवला.अशा आनेक आठवणी आहेत वेळेचा विचार करता तुर्तच सध्या पुर्ण विराम.!!

पुनच्छ!??

साहेब आपणास! जयंती निमीत्त भावपुर्ण आदरांजली!!!

**प्रा. दत्ता म्हस्के सर, जुन्नर**
**साईसोनु कॉम्प्युटर्स,**
**साईराज भेळ, कॉम्प्युटर वर्ल्ड, ओतुर**
**श्री. वल्लभ ना.पतसंस्था, जुन्नर**
**रोटरी क्लब ऑफ जुन्नर, शिवनेरी**



संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस



दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# मालपाणी विद्यालयाचा योग स्पर्धेत प्रथम क्रमांक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आंतरराष्ट्रीय योग उत्सव समिती संगमनेर यांच्यावतीने शहरात आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या ६६ विद्यार्थ्यांनी मंचावर आपल्या उत्कृष्ट योग सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

मालपाणी लॉन्स येथे आयोजित या भव्य योग दिन कार्यक्रमात संगमनेर शहरातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात मालपाणी विद्यालयाच्या इयत्ता सातवी व आठवीच्या सर्वाधिक एकूण ३२० विद्यार्थ्यांपैकी ६६ विद्यार्थ्यांनी योग दिन कार्यक्रमाच्या मंचावर अतिशय अचूक व लयबद्ध पद्धतीने चक्रासनाचे व इतर आसनांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट योग प्रात्यक्षिकाने उपस्थित सर्वांनाच अचंबित केले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध हालचाली, एकाग्रता आणि योगाभ्यासातील सफाईदारपणा यामुळे मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी गीता परिवारचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि योगाविषयीच्या आवडीचे त्यांनी अभिनंदन करत सन्मान चिन्ह समारंभपूर्वक प्रदान केले. या योग दिन कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसमवेत विद्यालयातील शिक्षक सुजाता शेलार, अंबादास बुलाखे, अमोल सस्कर, प्रतापराव ठोंबरे, दिपक रहाणे आणि श्रावणी बुकदाने यांचा सहभाग व मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट, माळवाडी (बोटा) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा) - श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा) येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. योगामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक संतुलन, एकाग्रता व सकारात्मकता वाढते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

योग व प्राणायाम मार्गदर्शक डॉ. अक्षदा सूर्यवंशी यांनी विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थिनी साक्षी मांडे, अस्मिता डोंगरे व कादंबरी कुरकुटे यांनी योगाचे महत्त्व विषद केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असल्याचे सांगितले. डॉ. सागर सांगळे व डॉ. केशव आरोटे यांनी योगामुळे निरोगी व तणावमुक्त जीवन जगण्यास मदत होते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल खेमनार व ओम गुंड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीने प्रा. निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

यावेळी प्रा. आकाश शेळके, प्रा. स्वप्नील वरे, प्रा. माधुरी सुपेकर, प्रा. ज्योत्स्ना शेलार, प्रा. समीक्षा बिबवे, प्रा. ज्योती दातीर, प्रा. राधिका जाधव, प्रा. डुंबरे मॅडम, अकाउंटंट अक्षय कुरकुटे तसेच स्टोअर इन्चार्ज अजय मेंगळ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीने विशेष परिश्रम घेतले.

# जीवनात यशाची गुरुकिल्ली परिश्रमातच - कुटे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सुकेवाडी येथील शुक्लेश्वर विद्यालयात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा तसेच इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य भारत कुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन केले.

विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धा, उपक्रम व प्रकल्प राबविले जातात. विद्यार्थ्यांनी मोबाईल व टीव्हीपासून दूर राहून अभ्यासासह विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मणराव कुटे होते. त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच यश मिळते, असे सांगितले. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल गोरख कुटे यांचा तसेच मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी श्रावणी सुदाम कुटे हिचा सत्कार करण्यात आला.

दहावी बोर्ड, पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच रस्सीखेच स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमास शाळा समितीचे सदस्य, शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

वाढदिवसाच्या शुभेच्छा

23 जून



मा. श्री. सो. ता. कळसकर (गुरूजी)

राष्ट्रपती पोरितोषीक विजेते, आदर्श शिक्षक


# थोरात महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, योग प्रशिक्षक श्री. बजरंग जेडगुले, क्रीडा संचालक डॉ. प्रमोद खैरे, विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात योग प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर योग प्रशिक्षक बजरंग जेडगुले यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून त्यामागील शास्त्रीय महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे शरीरातील स्नायू बळकट होतात, लवचिकता वाढते, श्वसनक्रिया सुधारते तसेच मानसिक तणाव कमी होऊन मन शांत, प्रसन्न व एकाग्र राहण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, पाठदुखी यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित अनेक समस्यांवर नियंत्रण मिळविण्यास मदत होते. विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती, एकाग्रता, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढविण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त असल्याचेही मार्गदर्शन करण्यात आले. योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून आज जगभर त्याचा स्वीकार होत आहे.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांनी योग ही भारतीय संस्कृतीची जगाला मिळालेली अमूल्य देणगी असल्याचे सांगितले. निरोगी शरीर, शांत मन आणि सुदृढ समाज घडविण्यासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आरोग्याचीही तितकीच काळजी घेत नियमित योगाभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद खैरे यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याची प्रतिज्ञा घेतली. डॉ. विजयकांत बैरागी यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त केएम हॉस्पिटलमध्ये योग सत्र उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनर - आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त केएम हॉस्पिटल संगमनेर येथे योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व इतर सहभागी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देत आरोग्याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

'निरोगी शरीर, शांत मन आणि संतुलित जीवनशैली' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या योग सत्रात विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचा समावेश करण्यात आला. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यही सुदृढ राहण्यास मदत होते, ताणतणाव कमी होतो आणि जीवनशैलीशी संबंधित अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो, असा संदेश यावेळी देण्यात आला. आरोग्यसेवेबरोबरच समाजात आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी घच् कैळिंरिश्र सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून 'निरोगी संगमनेरच्या दिशेने एक पाऊल' उचलण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांच्यात समतोल साधणारी जीवनपद्धती आहे. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश केल्यास निरोगी आणि आनंदी जीवन जगणे अधिक सुलभ होऊ शकते. या उपक्रमाला सहभागींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, समाजात आरोग्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# आश्वी बुद्रुकमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - रयत शिक्षण संस्थेच्या अश्वी इंग्लिश स्कूल व महाविद्यालय, आश्वी बुद्रुक येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात ६०० हून अधिक विद्यार्थी व ३२ सेवकांनी सहभाग घेत सामूहिक योगाभ्यास केला.

यावेळी प्रभारी प्राचार्य दिपक चव्हाण यांनी योगाचे महत्त्व विषद करताना नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ, मन शांत व एकाग्रता वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा पाया असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात योग मार्गदर्शक सुवर्णा वाकचौरे यांनी विविध योगप्रकारांची माहिती देत त्यांच्या आरोग्यदायी फायद्यांविषयी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक रमेश थेटे यांनी योगामुळे तणाव कमी होऊन रोगप्रतिकारशक्ती वाढते, असे सांगितले. या प्रसंगी प्राचार्य दिपक चव्हाण, पर्यवेक्षक रमेश थेटे, सुवर्णा वाकचौरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगर जिल्हा कारागृहात योग दिन साजरा




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- कारागृह विभागाच्या सुधारणा व पुनर्वसन या ब्रीदवाक्याला अनुसरून बंदींच्या शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अहिल्यानगर जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. २३० बंदींनी योग दिन कार्यक्रमात सहभाग नोंदवत योगातून निरोगी जीवनाचा संदेश दिला.

अहिल्यानगर जिल्हा कारागृह, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (भारत सरकार) पुरस्कृत जनशिक्षण संस्थान, तसेच अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-६ बी. वाय. फड, कारागृह अधीक्षक संतोष कवार, योग प्रशिक्षक संजय सुरसे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. फड म्हणाले, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून मानसिक आरोग्य, सकारात्मक ऊर्जा आणि निरोगी जीवनासाठी योगसाधना अत्यावश्यक असल्याचे ते म्हणाले.

कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी प्रास्ताविकात आधुनिक धकाधकीच्या व तणावग्रस्त जीवनात योगाचे महत्त्व अधोरेखित केले. योगासारखे उपक्रम बंदींच्या व्यक्तिमत्त्व विकासासह मानसिक स्थैर्य निर्माण करण्यास उपयुक्त ठरत असल्याचे ते म्हणाले.

योग विद्याम संस्थानचे योग प्रशिक्षक संजय सुरसे आणि सहकारी योगशिक्षक पोकळे यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून योगाचे मानसिक, शारीरिक, आध्यात्मिक व भावनिक संतुलन राखण्यासाठीचे महत्त्व स्पष्ट केले.

श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या आर्ट ऑफ लिव्हिंग शाखेमार्फत कारागृहात सुरू करण्यात आलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बंदींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या बॅरेक्सचे उद्घाटनही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तुरुंगाधिकारी विजय साळुंके, अरुण मदने, सुबेदार हिराचंद आंबोरे, हवालदार सुरेश जगर, संदीप जगदाळे, राहुल पठारे, नंदकुमार शिंदे, श्रीकांत गोरवडे, मोहसीन शेख तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय...

## कर्जमाफीच्या पलीकडे विचार करण्याची वेळ

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या लोकसंख्येतील मोठा हिस्सा आजही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. देशाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी पार पाडणारा शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र विडंबना अशी की, संपूर्ण देशाचे पोट भरणारा हाच अन्नदाता आज आर्थिक, सामाजिक आणि नैसर्गिक संकटांच्या विळख्यात अडकला आहे. वाढते उत्पादन खर्च, बदलते हवामान, बाजारपेठेतील अनिश्चितता, अपुरी पायाभूत सुविधा आणि कर्जबाजारीपणा या समस्यांमुळे शेतकरी दिवसेंदिवस अधिक असुरक्षित होत चालला आहे. गेल्या काही दशकांत शेतीसमोरील आव्हानांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. पूर्वी निसर्गावर अवलंबून असलेली शेती आजही हवामानाच्या लहरीपणापुढे हतबल आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे शेतीचे नियोजन करणे कठीण झाले आहे. शेतकरी योग्य वेळी पेरणी करतो, पिकांची काळजी घेतो; परंतु एका नैसर्गिक आपत्तीमुळे त्याच्या संपूर्ण वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरते. हवामान बदलाचा सर्वाधिक फटका जर कोणाला बसत असेल, तर तो शेतकरी वर्गाला बसत आहे. याचबरोबर शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सिंचन व्यवस्था, डिझेल, वीज आणि मजुरी यांचा खर्च सातत्याने वाढत आहे. काही वर्षांपूर्वी ज्या खर्चात एक एकर शेती केली जात होती, त्याच्या अनेक पटींनी अधिक खर्च आज करावा लागत आहे. मात्र उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतीमालाला मिळणारा भाव वाढलेला नाही. त्यामुळे उत्पादन वाढले तरी नफा मिळेलच याची शाश्वती राहिलेली नाही.

बाजारपेठेतील अस्थिरता ही शेतकऱ्यांसमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. कांदा, टोमॅटो, सोयाबीन, कापूस, ऊस, डाळी किंवा फळबाग पिके यांचे दर वर्षभर स्थिर राहत नाहीत. कधी भाव गगनाला भिडतात, तर कधी उत्पादन खर्चही निघत नाही. अनेक वेळा भरघोस उत्पादन झाल्यास बाजारभाव कोसळतात आणि शेतकऱ्यांना आपला माल अक्षरशः मातीमोल दराने विकावा लागतो. याउलट उत्पादन कमी झाले तर ग्राहकांना महागाईचा सामना करावा लागतो. या परिस्थितीत शेतकरी आणि ग्राहक दोघेही नुकसान सहन करतात, तर मध्यस्थांचा फायदा वाढतो. शेतकऱ्यांच्या कुटुंबीय गरजाही दिवसेंदिवस वाढत आहेत. मुलांचे शिक्षण, आरोग्यसेवा, विवाह, घरबांधणी, वाहतूक आणि इतर सामाजिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी आर्थिक संसाधनांची आवश्यकता असते. शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने शेतकऱ्याला बँका, सहकारी संस्था किंवा खासगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते. सुरुवातीला हे कर्ज शेतीसाठी घेतले जाते; परंतु हळूहळू ते दैनंदिन गरजा भागवण्यासाठीही वापरले जाऊ लागते. परिणामी कर्जाचा बोजा वाढत जातो. या पार्श्वभूमीवर सरकारकडून वेळोवेळी कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात. कर्जमाफीमुळे काही प्रमाणात दिलासा मिळतो, हे खरे आहे. ज्या शेतकऱ्यांवर कर्जाचा मोठा बोजा असतो, त्यांना तात्पुरता आधार मिळतो. मात्र कर्जमाफी हा समस्येचा कायमस्वरूपी उपाय नाही. कारण कर्जमाफी केवळ जुन्या कर्जाचा प्रश्न सोडवते; परंतु शेतकरी कर्जबाजारी होण्यामागील मूळ कारणे कायम राहतात. त्यामुळे काही काळानंतर तो पुन्हा नवीन कर्ज घेण्यास भाग पडतो आणि हे दुष्टचक्र पुन्हा सुरू होते. कर्जमाफी योजनांमध्ये अनेकदा जाचक अटी, पात्रतेचे निकष आणि प्रशासकीय गुंतागुंत असते. अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतात, तर काहींना लाभ मिळतो. त्यामुळे शेतकरी वर्गात असमानता आणि नाराजी निर्माण होते. काही वेळा कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही अन्याय झाल्याची भावना निर्माण होते. परिणामी आर्थिक शिस्तीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. कर्जमाफीचा विषय राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा बनला आहे. निवडणुका जवळ आल्या की कर्जमाफीची आश्वासने दिली जातात. शेतकऱ्यांच्या भावनांना हात घालून राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न होतो. मात्र निवडणुकांनंतर शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांवर अपेक्षित गतीने काम होताना दिसत नाही. त्यामुळे शेतकरी पुन्हा त्याच अडचणींचा सामना करत राहतो. खऱ्या अर्थाने शेतकरी सशक्त करायचा असेल तर शेतीला नफ्याचा व्यवसाय बनवणे आवश्यक आहे. यासाठी शेतीमालाला हमीभावाची प्रभावी व्यवस्था, आधुनिक बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, प्रक्रिया उद्योगांची निर्मिती आणि साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनावर मूल्यवर्धन करता आले, तर त्यांचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढू शकते.

# सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयात ओरिएंटेशन व कॅम्पस प्लेसमेंट इंटरव्ह्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्टुडंट सपोर्ट, करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेल तसेच एमडी इंडिया हेल्थ इन्शुरन्स टीपीए प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १८ जून २०२६ रोजी इंटर्न आणि तृतीय वर्ष बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांसाठी 'ओरिएंटेशन फॉलोड बाय कॅम्पस प्लेसमेंट इंटरव्ह्यू' या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात सुमारे १०० विद्यार्थ्यांना आरोग्य विमा क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर घेण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंट मुलाखतीत महाविद्यालयातील ३९ इंटर्न विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांनी प्राथमिक स्तरावरील मुलाखत यशस्वीरित्या उत्तीर्ण केली.

कार्यक्रमासाठी एमडी इंडिया हेल्थ इन्शुरन्स टीपीए प्रा. लि. यांच्याकडून मोहम्मद मुशर्रफ (एचआर हेड), डॉ. नारायण राठोड (प्रोजेक्ट हेड), चेतन चव्हाण (एचआर ग्रुप लीडर), डॉ. अनिकेत भालसिंग (जिल्हा प्रमुख, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, अहिल्यानगर) तसेच डॉ. प्रियांका घाडगे (जिल्हा वैद्यकीय अधिकारी, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना) हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन स्टुडंट सपोर्ट, करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या संयोजिका डॉ. पल्लवी जोशी यांनी केले. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे विद्यार्थी व पालकांकडून स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. जयश्री सराफ, डॉ. नैमिष सराफ, डॉ. ऋता सराफ तसेच प्राचार्य डॉ. सुयोग व्यास यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने विविध उपक्रम राबवत असून हा कार्यक्रम त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# जिजामाता स्कूलमध्ये 'स्कूल काउन्सिल इलेक्शन' उत्साहात




युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

जिजामाता स्कूलमध्ये हेड बॉय, हेड गर्ल, असिस्टंट हेड बॉय आणि असिस्टंट हेड गर्ल या पदांसाठी शुक्रवार, दि. १९ जून रोजी विद्यार्थी प्रतिनिधींची निवडणूक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रिया, मतदानाचे महत्त्व तसेच नागरिक म्हणून आपले हक्क आणि कर्तव्य यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी या उद्देशाने शाळेने या निवडणुकीचे आयोजन केले होते.

निवडणूक प्रक्रिया अधिक वास्तववादी आणि अनुभवाधारित व्हावी यासाठी प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणेच सर्व टप्पे राबविण्यात आले. इच्छुक विद्यार्थ्यांनी उमेदवारी अर्ज भरून निवडणूक प्रक्रियेत सहभाग नोंदविला. त्यानंतर उमेदवारांना स्वतंत्र निवडणूक निशाणी देण्यात आली. उमेदवारांनी आपल्या प्रचारासाठी विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व आपल्या योजना आणि उद्दिष्टे मांडली.

निवडणुकीच्या दिवशी शाळेत मतदानासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रियेदरम्यान गोपनीयता आणि पारदर्शकता राखण्यावर विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निवडणूक म्हणजे केवळ मतदान नसून जबाबदार नागरिक घडविण्याची प्रक्रिया असल्याची जाणीव झाली. तसेच लोकशाही मूल्ये, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात शाळेला यश मिळाले.

शाळा प्रशासनाने सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित होण्यास मदत होते आणि भविष्यात जागरूक नागरिक घडण्यास हातभार लागतो. निवडणुकीत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण शाळेचे वातावरण लोकशाहीमय आणि प्रेरणादायी बनले.

# स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय व वैज्ञानिक क्षेत्रात घवघवीत यश





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा तसेच वैज्ञानिक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

जनसेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगर आयोजित डॉ. सी. व्ही. रमण बाल वैज्ञानिक परीक्षा २०२६ मध्ये शाळेच्या कु. ऋतुपर्ण राहुल गायकवाड व कु. कर्तव्य अजित नेहे (इयत्ता आठवी) यांनी तालुका स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशामुळे त्यांची वैज्ञानिक कार्यशाळा तसेच इस्रो (खडठज) शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले.

याचबरोबर स्मार्ट अकॅडमी, जिव्हाळा उद्योग समूह, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय पातळीवरील जनरल नॉलेज, गणित व चित्रकला स्पर्धा २०२६ मध्येही शाळेच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता आठवीतील कु. ऋतुपर्ण निता राहुल गायकवाड याने ७वी ते १०वी गटामध्ये गणित आणि जनरल नॉलेज या दोन्ही स्पर्धांमध्ये राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले. या स्पर्धेत देशातील विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अत्यंत कमी वेळेत २०० गणिती उदाहरणे व २०० सामान्य ज्ञान प्रश्न सोडविण्याच्या आव्हानात्मक स्पर्धेत ऋतुपर्णने उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, जिज्ञासू वृत्ती, सातत्यपूर्ण अभ्यास तसेच शिक्षक व पालकांचे मार्गदर्शन असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आजपर्यंत मिळविलेल्या यशामुळे शाळेची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून इतर विद्यार्थ्यांनाही विज्ञान, गणित व विविध स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या सर्व शिक्षकांनी, पालकांनी तसेच परिसरातील नागरिकांनी त्यांचे कौतुक केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या या यशामुळे संपूर्ण संगमनेर तालुक्याचा गौरव वाढला आहे.

पान १ वरून

## अण्णा हजारे पुन्हा...

१२ जून रोजी माहिती अधिकार कायद्यात दुरुस्त्या करण्यापूर्वी जनतेच्या हरकती घेणे आवश्यक होते. परंतु त्या का घेण्यात आल्या नाहीत, असा सवाल अण्णा हजारे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषेदत केला.दरम्यान, बुधवारी राज्याचे माहिती आयुक्त राहुल पांडे राळेगणसिद्धीत येणार आहेत. पांडे यांनी सोमवारी दुपारी फोनवर हजारे यांच्याशी चर्चा केली. बुधवारी ते सविस्तर चर्चेसाठी येणार आहेत. माहिती अधिकार कायद्यासाठी अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रभर जनजागृती दौरे करून २००३ मध्ये मुंबईतील आझाद मैदानात, २००४ मध्ये राळेगणसिद्धी येथे व २००६ मध्ये केंद्रीय माहितीचा अधिकार कायद्यासाठी आळंदीत उपोषण केले होते.

## संगमनेरमध्ये नव्या...

असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी अमर कतारी, आसिफ तांबोळी, शहरप्रमुख फैसल सय्यद, युवासेना विधानसभा प्रमुख अमोल डुकरे, श्रीकांत खिची, लोक कतारी, शुभम काळे, आरती मसराम, लक्ष्मी खिची, रोशन गायकवाड, साधना शिवलकर, सुगरिता खिची, मोहिनी कतारी यांच्यासह स्थानिक महिला, नागरिक आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५ २२५१२९

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
NASREH ABDUL RASHID MOMIN
NASHRA ABDUL RASHID MOMIN
TO NEW NAME AS
NASHRA ABDUL RASID MOMIN

पाहिजेत
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

भाड्याने देणे
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

पाहिजेत
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
8999795056

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

पाहिजेत
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

भाड्याने देणे आहे
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458






# रोटरी क्लबने आयोजित केलेला श्रमप्रतिष्ठा सन्मान सोहळा हा प्रेरणादायी उपक्रम - माजी मंत्री थोरात

संगमनेर(प्रतिनिधी )

रोटरी क्लबने आयोजित केलेला हा प्रेरणादायी उपक्रम समाजासाठी निश्चितच आदर्शवत आहे. अशा सोहळ्यांमधून कष्ट, त्याग, संस्कार आणि पालकांविषयीचा आदर या मूल्यांना बळ मिळते तसेच नव्या पिढीला मेहनत, जिद्द आणि कृतज्ञतेची प्रेरणा मिळते.असे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले.

स्व. के. बी. दादा सभागृह, एस. एम. बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर येथे रोटरी क्लब ऑफ संगमनेरतर्फे आयोजित करण्यात आलेल्या श्रमप्रतिष्ठा सन्मान सोहळा - २०२६ या कार्यक्रमात कष्टकरी पालकांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते.अध्यक्षस्थानी रोटरी क्लब संगमनेरचे अध्यक्ष विश्वनाथ मालानी हे होते तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री संगमनेर भूषण रघुवीर खेडकर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य हे व्यासपीठावर उपस्थित होते.



यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले कि, यशस्वी व्यक्तींचा गौरव समाजात अनेक ठिकाणी होत असतो; मात्र त्या यशामागे आयुष्यभर कष्ट, त्याग, संघर्ष आणि संस्कारांची भक्कम पायाभरणी करणाऱ्या पालकांचा सन्मान क्वचितच होताना दिसतो. अशाच यशामागील खऱ्या शिल्पकारांचा गौरव रोटरी क्लब, संगमनेरच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केला असून हा प्रेरणादायी व प्रशासकीय उपक्रम असल्याचे माजी मंत्री थोरात यांनी म्हंटले.पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी आपल्या मनोगतातून पालकांच्या कष्टांचे मोल अधोरेखित करताना सांगितले की, कोणत्याही यशस्वी व्यक्तीमागे त्यागी आई-वडिलांचे कष्ट आणि संस्कार उभे असतात. आज सन्मानित होत असलेले हे पालक खऱ्या अर्थाने समाजाचे आदर्श आहेत.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल रो. अमोल वैद्य यांनी रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या सामाजिक व विधायक उपक्रमांचा आढावा घेत आगामी उपक्रमांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.यावर्षी सौ.इंदुमती व .मारुती मुरलीधर फटांगरे (पोखरी बाळेश्वर), सौ. योगिता व श्री.आदित्य दीपक घाटगे (संगमनेर), सौ. संगीता व अशोक लक्ष्मण गायकवाड (नान्नज दुमाला), सौ. सरूबाई व रायभान किसन अनर्थे (चिंचपूर) आणि सौ. शुभांगी व श्री.संजय रावसाहेब दिघे (जोर्वे) या पालकांचा श्रमप्रतिष्ठा सन्मान पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला.या पालकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दिवस-रात्र परिश्रम करत आपल्या पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. स्वतःच्या इच्छा-आकांक्षा बाजूला ठेवून मुलांच्या उज्वल भविष्यासाठी झटणाऱ्या या पालकांच्या त्यागाचे स्मरण होताच सभागृहातील वातावरण अनेकदा भावुक झाले.

यावेळी पुरस्कारार्थी पालकांच्या यशस्वी पाल्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. श्री संदीप फटांगरे, कु. यशस्विनी घाटगे, ऋतुजा गायकवाड वृंदा अनर्थे आणि श्री धनंजय दिघे यांनी आपल्या यशस्वी प्रवासातील संघर्षमय दिवस, पालकांनी घेतलेले कष्ट, केलेले त्याग आणि दिलेले संस्कार यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. त्यांच्या मनोगतांनी उपस्थितांच्या डोळ्यांत अनेकदा अश्रू तरळले.

यावेळी त्यांनी रोटरी क्लब ऑफ संगमनेरने या अनोख्या उपक्रमाद्वारे पालकांचा सन्मान केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी यांनी केले. सूत्रसंचालन रो. भारतभूषण नावंदर आणि रो. समीर शहा यांनी केले, तर सचिव रो. सौरभ म्हाळस यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी माजी प्राचार्य टी एन कानवडे, प्रा. चं. का. देशमुख, ब्रम्हदेव वालझाडे, रोटरी क्लब ऑफ संगमनेर च्या फर्स्ट लेडी सौ. मेघना विश्वनाथ मालाणी आदी मान्यवर, पुरस्कार्थी यांचे कुटुंबिय, नातेवाईक, मित्रपरिवार, रोटरी क्लबचे सदस्य ही यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख म्हणून रो. सुनील घुले सर, रो. डॉ. किशोर पोखरकर यांचेसह रो. आनंद हासे, रो. राजेंद्र खोसे, रो. विकास लावरे, रो. हर्षल भागवत, रो. अजित काकडे, रो. दीपक मणियार, रो. दिलीप मालपाणी, रो. महेश वाकचौरे, रो. संदेश चोपडे, रो. अमित पवार यांच्यासह सर्व रोटरी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# ५ हजारांची लाच घेताना खासगी इसम पकडला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई करत मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने ५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या एका खासगी इसमाला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महसूल विभागासह परिसरात मोठी खळबळ उडाली असून आरोपीविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी (दि. २२ जून) ही धडक कारवाई केली. नितीन किसन खर्डे (वय २९, रा. चंदनापुरी झोळे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या खासगी इसमाचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे जेसीबी मशीनद्वारे शेतजमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम करतात. ८ जून २०२६ रोजी आरोपी नितीन खर्डे याने तक्रारदाराला तलाठी कार्यालयात बोलावून घेतले. तेथे मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यासोबत कामासंदर्भात चर्चा झाल्यानंतर, कार्यालयाबाहेर येताच खर्डे याने तक्रारदाराला गाठले.

शेतजमिनीच्या सपाटीकरणाचे काम कोणत्याही अडथळ्याविना सुरू ठेवण्यासाठी मंडळ अधिकाऱ्याकरिता ५ हजार रुपयांची लाच देण्याची मागणी त्याने केली. तसेच ही रक्कम न दिल्यास तक्रारदारावर अवैध गौण खनिज उत्खननाचा गुन्हा दाखल करण्याची धमकीही दिली. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या तक्रारदाराने नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. एसीबीने १९ जून रोजी पडताळणी केली असता आरोपीने ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे आणि ती स्वीकारण्यास संमती दिल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर एसीबीने सोमवारी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून ५०० रुपयांच्या १० नोटांच्या स्वरूपातील ५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारत असतानाच दबा धरून बसलेल्या पथकाने नितीन खर्डे याला रंगेहात पकडले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी, पोलीस हवालदार संदीप वनवे आणि पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद पाळदे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय कामासाठी लाचेची मागणी होत असल्यास किंवा भ्रष्टाचारासंबंधी माहिती असल्यास तत्काळ एसीबीशी संपर्क साधावा.

# शालार्थ घोटाळ्यात ९०० संशयित रडारवर

मुंबई (वृत्तंस्था०

राज्यातील शिक्षण विभागाला हादरवून सोडणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. या प्रकरणात काही संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकारी तपास यंत्रणांच्या रडारवर आले आहेत. जवळपास ९०० संशयितांविरुद्ध गुन्हे दाखल असलेल्या या प्रकरणाची व्याप्ती संपूर्ण राज्यभर पसरली आहे. दरम्यान आता याच नाशिक शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. एकाच जावक क्रमांकाचा वापर करून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आल्याचे या तपासात उघड झाले आहे.नाशिक शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासादरम्यान उपलब्ध कागदपत्रांमध्ये विरोधाभास दिसून आला. त्यामुळे आता अधिकृत नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा संशय आणखी बळावला आहे. धक्कादायक म्हणजे, एकाच अधिकृत आदेशाखाली भिन्न नावांचे संच नोंदविण्यात आल्याचे दिसून आले आहे.


Shri Baleshwar Shaikshanik Va Krushi Vikas Foundation's

**Shri Swami Samarth Institute of Management & Technology**

(Approved by AICTE, DTE, Government of Maharashtra & Savitribai Phule Pune University)

At-Malwadi Post-Bota Tal-Sangamner Dist Ahilyanagar Pin Code-422602

Email Id-bskf42@gmail.com Mobile No-7588094642/43

**AD-HOC APPOINTEMENT 2026-27**

| Sr. No | Post | Department | Vacancies | Category |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor | MBA | 2 | 1-SC; 1-Open |
| | | MCA | 2 | 1-SC; 1-Open |
| 2 | Associate Professor | MBA | 4 | 1-SC;1-VJ;1-OBC; 1-OPEN |
| | | MCA | 4 | 1-SC;1-VJ;1-OBC; 1-OPEN |
| | | BBA | 2 | 1-SC; 1-Open |
| 3 | Assistant Professor | MBA | 10 | 1-SC;1-ST; 1-VJ;2-OBC; 1-SEBC;1-EWS;3-OPEN |
| | | MCA | 10 | 1-SC;1-ST; 1-VJ;2-OBC; 1-SEBC;1-EWS;3-OPEN |
| | | BBA | 5 | 1-SC;1-VJ;1-OBC;1-SEBC; 1-OPEN |

Terms and Conditions-
1. Appointment will be purely on Ad hoc basis for the AY 2026-27.
2. Pay scale, service rules. Eligibility & Qualification norms are as per AICTE, New Delhi, Savitribai Phule Pune University, Pune, State Government rules and regulations or relevant norms.
3. Candidates fulfilling eligibility and qualification and experience documents on college Email - shrisamarthiomt@gmail.com or by post on college official address within 10 days from date of advertisement.
4. Received applications will be scrutinized & date of interview will be informed by email or post to aspirant and eligible candidates.
5. Date of interview is scheduled 29/06/2026. All notified candidates are requested to be present at college administrative office at 09:30 am. with all documents.

Secretary



दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

वाढदिवसाच्या शुभेच्छा



मा. श्री. निलेश जाजू

संगमनेर नगरपरिषदेच माजी उपनगराध्यक्ष व संगमनेर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष



मा. श्री. आनंद भोगावत

शितल प्लायचे संचालक


# लग्नाच्या स्वप्नांचा थरारक शेवट !

## १७ कोटींचा पॅलेस, दोन चार्टर्ड विमानांची तयारी

पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील लोहगड किल्ल्यावर घडलेल्या एका तरुणाच्या मृत्यूच्या घटनेने धक्कादायक वळण घेतले असून, सुरुवातीला अपघात मानल्या गेलेल्या या प्रकरणामागे कटकारस्थान असल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. अवघ्या काही महिन्यांवर आलेले लग्न, कोट्यवधींची तयारी आणि उज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या २४ वर्षीय केतन अग्रवालचा मृत्यू हा अपघात नसून नियोजित हत्येचा भाग असल्याचा संशय बळावला आहे.

मृत केतन विशाल अग्रवाल याचा विवाह नोव्हेंबर महिन्यात सिया गोयल हिच्यासोबत होणार होता. या विवाहासाठी कुटुंबीयांनी राजस्थानमधील जयपूर येथे तब्बल १७ कोटी रुपये खर्च करून आलिशान पॅलेस बुक केला होता, तर पाहुण्यांच्या प्रवासासाठी दोन विशेष विमानांचीही व्यवस्था करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या भव्य लग्नसोहळ्याची स्वप्ने पूर्ण होण्याआधीच केतनचा दुर्दैवी अंत झाला.

गुरुवारी सियाचा वाढदिवस असल्याने दोघे लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेले होते. सुरुवातीला फोटो काढताना केतनचा तोल जाऊन तो दरीत कोसळल्याचे सांगितले गेले. मात्र लोणावळा ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळावरील पुरावे, मोबाईल लोकेशन, तांत्रिक विश्लेषण आणि संबंधितांच्या जबाबांची पडताळणी केली असता धक्कादायक सत्य समोर आले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, सियाला हे लग्न मान्य नव्हते. त्यामुळे तिने आपल्या प्रियकरासोबत मिळून केतनला कायमचा मार्गातून हटवण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. यासाठी वाढदिवसाच्या निमित्ताने त्याला लोहगडावर नेण्यात आले आणि योग्य संधी साधून दरीत ढकलण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.



**होणाऱ्या पत्नीनेच रचला मृत्यूचा कट ?**

या प्रकरणात सिया गोयल आणि तिच्या कथित प्रियकराला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, या कटात आणखी कोणी सहभागी होते का याचाही पोलिस कसून तपास करत आहेत. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेमागील सत्य उघड होताच दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ज्या तरुणीसोबत आयुष्याची नवी सुरुवात करण्याची स्वप्ने केतन पाहत होता, तिच्याच वाढदिवशी त्याचा मृत्यू झाल्याने या प्रकरणाने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रेम, विश्वास आणि नात्यांच्या आड लपलेल्या या कथित कटकारस्थानाने समाजमन हादरून गेले असून, पोलिस तपासातून आणखी कोणते धक्कादायक खुलासे समोर येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दुधातील भेसळीची साखळी

## पाण्यापासून रसायनांपर्यंतचा धोकादायक प्रवास




महाराष्ट्रात दुध भेसळ हा सध्या चर्चेचा विषय आहे. एक बदल केला की दुसरी गोष्ट बिघडते. ती लपवण्यासाठी आणखी काही घालावे लागते आणि शेवटी दुध हे नैसर्गिक अन्न न राहता ते रसायनाचा प्रोजेक्ट बनते. आपण ही सारी एकूण प्रक्रिया पाहू.

साधारणता दुधात फॅट व एस.एन.एफ यांचे प्रमाण अनुक्रमे ४ टक्के व ८.५% असते. समजा १०० लिटर दुधात २० लिटर पाणी टाकले तर हे प्रमाण अनुक्रमे ३.३ टक्के व ७% होते. कारण पाणी घातल्यामुळे त्याची ती घनता कमी होते. समस्या इथून सुरु होते. कारण डेअरीला दुध घालतांना फॅट किमान ३.५% व एस.एन.एफ ८.५% अशी अट ठेवतात. मग हे घटक कमी पडल्याने (पाणी घातल्यामुळे) दुध नाकारले जाऊ शकते.

इथून पुढे सुरु होते भेसळीची साखळी (चेन). पाणी घातल्याने दुध पात्तळ दिसते म्हणजे त्याची व्हिस्कॉसिटी कमी होते. मग काही लोक त्यात स्टार्च घालतात. त्यामुळे दुधाला कृत्रिम घट्टपणा येतो. आता दुसरी समस्या. पाणी घातल्यावर दुधाची घनता कमी होते व घनता मोजणारे लॅक्टोमीटर बरोबर वाचन दाखवित नाही कारण दुधात घनपदार्थ (स्टार्च), किंवा साखर घालतात. त्यामुळे साखर विरघळून घनता वाढते.

आता तिसरी महत्वाची व सुक्ष्म समस्या. पाणी घातल्यामुळे एस.एन.एफ कमी होते. यात सात प्रोटीन महत्वाचे असते. प्रोटीन मध्ये नायट्रोजन जास्त असते. एस.एन.एफ मोजणारे मशीन प्रोटीन मॉलेक्यूल न मोजता ते प्रोटीन मधील नायट्रोजन मोजते. म्हणजे जास्त नायट्रोजन म्हणजे जास्त प्रोटीन. इथे लूप होल आहे. युरियामध्ये खूप जास्त नायट्रोजन असतो. म्हणून पाणी घातलेल्या दुधात काही लोक युरिया घालतात. त्यामुळे खरे प्रोटीन न वाढता फक्त नायट्रोजन वाढतो. मशीन /टेस्ट म्हणते प्रोटीन ठिक आहे. म्हणजे प्रोटीन वाचनात कृत्रिम वाढ दिसते.

पानी घातल्यामुळे फॅट कमी लागते. ग्राहक म्हणतो दुध पातळ आहे. मग काही लोक त्यात डिटर्जंट वापरतात. हे ऐकायला विचित्र वाटतं, पण डिटर्जंट फेस आणतो व एक स्निग्धमय टेक्सचर तयार होते.

आता समजा दुध खराब व्हायला लागले. म्हणजे जिवाणू दुधातील लॅक्टोज खाऊन लॅक्टिक सिड तयार होणे. अशा दुधाची सिडिटी वाढल्यामुळे डेअरी, ते नाकारते. अशा वेळी त्यात खाण्याचा सोडा किंवा कॉस्टिक सोडा वापरला जातो. सोडा सिड न्यूट्रल करतो. आणि नासणाऱ्या दुधाचा रासायनिक समतोल साधला जातो. उन्हाळ्यात ट्रान्सपोर्ट ला उशीर झाला. गारवा निर्माण साखळी नसेल तर जिवाणूची वाढ होते. अशा वेळी दूध खराब होऊ नये म्हणून त्यात हायड्रोजन पेरॉक्साइड किंवा फॉर्मलीन सारखी रसायने वापरली जातात. आता आपण वरील सारी साखळी एकत्र पाहू यात.

दुधात पाणी घातले - एस.एन.एफ कमी - घनता कमी - दुध पातळ - प्रोटीन वाचनात कमी - सिडिटी असंतुलन - स्टार्च - ग्लुकोज - युरिया - डिटर्जंट - सोडा. म्हणजे एक भेसळ दुसरी भेसळ निर्माण करते, हे समजून घेतल्यावर एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येईल की अनेक वेळा शेतकऱ्याचे दूध तुलनेत जास्त प्रामाणिक असू शकते. मग त्यात फॅट कमी जास्त होईल. कधी ते पातळ वाटेल. पण ते नैसर्गिक असू शकते. कारण दूध फॅक्टरी मध्ये तयार होत नाही. गाईचे खाणे, पाणी पिणे, हवामान, स्थानिक परिस्थिती, हिरवा चारा, ताण, यावर गाईचे दूध बदलते. म्हणून नैसर्गिक दूध रोज एकसारखे नसते.

पण ग्राहकाची मोठी समस्या म्हणजे त्याला रोज एकसारखे दूध हवे असते. म्हणजे दुधाचा रंग, घट्टपणा, चव, एकसारखी हवी असते पण निसर्ग प्रमाणित नसतो. फॅक्टरी प्रमाणित असते. फॅट कमी झाले तर प्रश्न, एस.एन.एफ कमी झाले तर प्रश्न, आम्लता वाढली तर प्रश्न. मग रसायनशास्त्रज्ञ सुरू होते. म्हणून पुढच्या काळात लोक पुन्हा स्थानिक दूध व्यवस्थेकडे जातील, असे वाटते. शेतकऱ्याकडून थेट दूध घेणे, जनावरे पाळणे आणि थोडे नैसर्गिक फरक सहन करणे हा जास्त टिकाऊ मार्ग असू शकतो. कारण शेवटी प्रश्न फक्त फॅट आणि एस. एन. एफ. चा प्रश्न आहे आपण नैसर्गिक दूध खातोय की रासायनिक अनैसर्गिक संतुलित रसायन !

वरील माहिती नीट समजून घेतल्यास त्यास लक्षात येईल की दुध विकण्यासाठी वाढवून नफा कमवण्यासाठी प्रथम दुधात पाण्याची भेसळ केली जाते, ते लपवण्यासाठी, इतर अन्य भेसळीचे पदार्थ वापरण्यात येते, व परिणामी दूध हे नैसर्गिक न राहता ते अनैसर्गिक दुध की जे आरोग्यास हानिकारक आहे.

महाराष्ट्रात आज एफडीए आयुक्तांनी दूध भेसळी विरुद्ध जी धडक मोहिम घेतली आहे त्याचे स्वागत करूया.

**बाळासाहेब कातोरे**

**सेवानिवृत्त , दुग्ध शाळा रसायन शास्त्रज्ञ, दुग्धशाळा विकास खाते, महाराष्ट्र राज्य.**

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेझर । जोधपुरी
पैठणी । घागरा । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिझायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# योगासन क्रीडा प्रकारात जागतिक स्तरावर करिअरची संधी - डॉ संजय मालपाणी



योगासन क्रीडा प्रकारामध्ये आता जागतिक स्तरावर करिअरची मोठी संधी निर्माण झाल्यामुळे योगासनपटूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी जगाचा क्रीडा मंच खुणावतो आहे. अधिकाधिक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी त्याचा लाभ घेतला पाहिजे' असे प्रतिपादन महाराष्ट्र योगासन स्पोर्ट फेडरेशनचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांनी केले.

गीता परिवाराच्या पुढाकाराने आणि आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने तसेच वर्ल्ड योगासन, एशियन योगासन, योगासन भारत, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन, बृहन्महाराष्ट्र योग परिषद, फिट इंडिया मुव्हमेंट, महाराष्ट्र योगासन स्पोर्टस् असोसिएशन, अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्टस् असोसिएशन, संगमनेर तालुका पंचायत समिती आणि संगमनेर नगर परिषद यांनी संयुक्तरीत्या मालपाणी लॉन्सच्या उत्सव सभागृहात योग दिवस उत्सवाचे आयोजन केले होते.

यामध्ये संगमनेर मधील पी.जे.आंबरे पाटील कन्या विद्यालय, ध्रुव ग्लोबल स्कूल, जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, मातोश्री रुक्मिणीबाई मालपाणी विद्यालय, पद्मरसिक शाह विद्यालय, कळसकर विद्यालय, बी.टी.मेहेर विद्यालय, बी.जी.डेरे इंग्लिश मीडियम स्कूल अशा आठ विद्यालयांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. 'योगासनामध्ये जीवनाची दिशा बदलण्याची प्रचंड क्षमता आहे. सुदृढ निरोगी जीवनाची पायाभरणी करण्याबरोबरच कार्यक्षमता आणि बुद्धीची आकलनक्षमता, स्मरणशक्ती इत्यादी गोष्टी वाढविण्याचे सामर्थ्य योग साधनेत आहे. प्राचीन काळातील ऋषीमुनींनी संपूर्ण विश्वाला योगसाधनेची अमूल्य देणगी दिली आहे. दररोज योगासने करणे हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे. त्यातून आरोग्यविषयक अनेक समस्यांचे निराकरण होणार आहे' असेही डॉ.मालपाणी म्हणाले.

यावेळी डॉ.मालपाणी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उदाहरण देताना वर्षानुवर्षे नियमित योगसाधना केल्यामुळे देशाचे पंतप्रधान आज वयाच्या ७६ व्या वर्षी देखील अठरा-अठरा तास काम करतात आणि मागील २५ वर्षांमध्ये एकदाही त्यांनी कधी सुट्टी घेतलेली नाही. याचा आदर्श विद्यार्थ्यांनी नजरेसमोर ठेवला पाहिजे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.मालपाणी यांच्यासह योग प्रशिक्षक प्रा.कैलास कानवडे, सरोज आसावा यांच्या हस्ते स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी चक्रासन या आसनाची स्पर्धा घेण्यात आली. योग प्रशिक्षक दत्ता भांदुर्गे यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना चषक प्रदान करण्यात आला.

# राजूर ग्रामपंचायतीची सत्ता पिचड गटाकडे

## उपसरपंच संतोष बनसोडे यांना स्वाक्षरीचे अधिकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील सर्वात मोठी पेसा ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजूर ग्रामपंचायतीच्या सत्तेची सूत्रे आता माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या गटाकडे आली आहेत. ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष बनसोडे यांना सरपंचांच्या स्वाक्षरीचे अधिकार देण्याचा निर्णय ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत एकमताने घेण्यात आला.

राजूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पुष्पा निगळे यांना एक कोटी चौदा लाख रुपयांच्या कथित अपहार प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३९(१) अन्वये पदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमधील बहुमत असलेल्या पिचड गटाकडे सत्तेची सूत्रे आली आहेत.

गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी राजेश पाटील यांनी बोलावलेल्या मासिक बैठकीत उपसरपंच संतोष बनसोडे यांना प्रशासकीय कामकाजासाठी स्वाक्षरीचे अधिकार देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. हा प्रस्ताव सदस्य अतुल पवार यांनी मांडला, तर राम बांगर यांनी त्यास अनुमोदन दिले. उपस्थित सर्व सदस्यांनी या ठरावास एकमताने मंजुरी दिली.

बैठकीस माजी सरपंच गणपतराव देशमुख, गोकुळ कानकाटे, अतुल पवार, राम बांगर, अक्षय देशमुख, सारिका वालझाडे, संगीता मैड, सुप्रिया डगळे, लता सोनवणे, रोहिणी देशमुख आणि विमल भांगरे यांच्यासह एकूण १२ सदस्य उपस्थित होते. ओंकार नवाळी हे बैठकीस उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांनी लेखी पाठिंबा दिल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, आमदार डॉ. किरण लहामटे गटाचे सदस्य राम मुर्तडक, रोहिणी माळवे, संगीता जाधव आणि संगीता मोहंडुळे हे बैठकीस अनुपस्थित राहिले. तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष मुतडक, माजी सभापती बाळासाहेब देशमुख आणि किशोर देशमुख यांचीही यावेळी उपस्थिती होती.

राजूर ग्रामपंचायतीतील या राजकीय घडामोडींमुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून, आगामी काळात ग्रामपंचायतीतील सत्तासंघर्ष आणि राजकीय हालचाली अधिक रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ओझर बंधाऱ्याजवळ १४ ब्रास वाळू चोरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील ओझर येथील प्रवरा नदीपात्रात बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, पाटबंधारे विभागाने ओझर बंधाऱ्याच्या वरील आणि खालील बाजूस वाळू चोरी करणाऱ्या अज्ञात इसमांविरुद्ध आश्वी पोलीस ठाण्यात २ स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. वाळू उपशामुळे नदीपात्राचे नुकसान होऊन पुराचा मोठा धोका निर्माण झाल्याचे यात म्हटले आहे.

प्रवरा डाव्या कालव्याचे उपविभागीय अधिकारी योगेश घोगरे यांनी या संदर्भात पहिली फिर्याद दिली आहे. त्यानुसार दिनांक २० जून रोजी रा रात्री ११:३० च्या सुमारास त्यांनी पाहणी केली असता, बंधाऱ्याच्य खालील बाजूस ५० हजार रुपये किंमतीची १० ब्रास वाळूची चोरी झाल्याचे आढळून आले. या चोरीमुळे नदीपात्राच्या तिरास धोका निर्माण झाला असून पाणी प्रदूषित झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

उपविभागीय अभियंता प्रितम शेवाळे यांनी दिलेल्या दुसऱ्या फिर्यादीनुसार, रात्री बंधाऱ्याच्या वरील बाजूस २० हजार रुपये किंमतीची ४ ब्रास वाळूची चोरी झाली आहे. या वाळू उपशामुळे नदीपात्रात खड्डे पडले असून पाण्याला अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी, आवर्तनाचा कालावधी वाढून पाण्याचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच नदीपात्राच्या तिरास धोका निर्माण झाल्याने पुराचा धोका वाढला असल्याचे पहिल्या आणि दुसऱ्या फिर्यादीत नमूद केले आहे. या दोन्ही प्रकरणांत बीएनएस कलम ३०३(२) सह महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ चे कलम ९३, ९४, ९८ आणि पर्यावरण संरक्षण कायद्याच्या विविध कलमांन्वये आश्वी पोलीस ठाण्यात हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605



चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
- हृदयरोग (Heart Diseases)
- मेंदूरोग (Brain Diseases)
- कर्करोग शस्त्रक्रिया
- अपघात (Accident)
- लहान बालकांची शस्त्रक्रिया
- गुडघ्याचे प्रत्यारोपण
- विद्युत अपघात रुग्ण
- कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
- डायलिसिस
- अपघात शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्यारोपण
- मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25